Prabodhan Education Society's

Vidya Prabodhini College of Commerce, Edu., Comp. and Mgmt., Parvari Goa

S.Y.B.A.B.ED SEMESTER END ASSESSMENT JANUARY 2022

COURSE TITLE: साहित्य आणि समाज

Semester: III | Duration: 2 Hours | Max Marks: 70

सूचना :

१. अंतर्गत निवडीनुसार सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे.

२. उजव्या हाताकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

प्र.१. पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (३x५=१५)

१. प्रमाण भाषेची कोणतीही पाच वैशिष्ट्ये लिहा.

२. व्यावसाय भाषा व व्यावहार भाषाभेद म्हणजे काय ते सांगून प्रत्येकी दोन उदाहरणे लिहा.

३. 'युगप्रवृत्ती' या घटकाचे विश्लेषण तेन याने कसे केले आहे?

४. संस्कृतीला क्रियाशील जिवंत शक्ती म्हणता येते का? स्पष्ट करा.

५. 'साहित्य समाजाचा आरसा आहे' हे विधान तुम्हाला कितपत योग्य वाटते?

प्र.२. पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (३x५=१५)

१. 'साहित्यामधून व्यक्त होणाऱ्या जीवनाशयाचा आणि सामाजिकतेचा घनिष्ठ संबंध असतो'. या विधानाचा परामर्श घ्या.

२. स्त्रियांची भाषा व पुरुषांची भाषा संदर्भात प्रत्येकी दोन उदाहरणे देवून फरक स्पष्ट करा.

३. साहित्यक्षेत्रातील वाचकाचे महत्व विशद करा.

४. संस्कृतीच्या कोणत्याही दोन व्याख्या लिहा.

५. मार्क्सचा 'पाया आणि इमला' सिद्धांत स्पष्ट करा.

प्र. ३. खालीलपैकी कोणत्याही दोहोंची सविस्तर उत्तरे लिहा. (२x५=१०)

१. साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य का मानले जाते? साधार सांगा.

२. समाज व साहित्याचे अस्तित्व व त्याच्या विकासास भाषेचे योगदान यावर सविस्तर चर्चा करा.

३. ग्रामीण समाज व शहरी समाज संवेदनशिलतेतील फरक सांगा.

४. साहित्यिक भाषेची वैशिष्ट्ये लिहा.

प्र. ४. खालीलपैकी कोणत्याही दोहोंची सविस्तर उत्तरे लिहा. (२x५=१०)

१. भाषेच्या कोणत्याही दोन व्याख्या लिहून भाषेच्या सहाय्याने संस्कृतीचे संवर्धन व संक्रमण कसे होत जाते यावर पाच मुद्दे लिहा.

२. संस्कृतीला साहित्याची सामग्री म्हणता येते का? सोदाहरण स्पष्ट करा.

३. मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांच्या परस्पर संबंधावर चर्चा करा.

४. लेखक व सामाजिकता यातील परस्परसंबंध कोणत्याही दोन मुद्यांच्या आधारे साधार मांडा.

प्र. ५ खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (१x१०=१०)

१. सुर्वे यांच्या काव्य विचारांवर कार्लमार्क्सच्या विचारांचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. साधार सांगा.

२. एखादा विशिष्ट जीवनानुभव एखाद्या विशिष्ट भाषेतूनच कसा व्यक्त होत जातो? सोदाहरण स्पष्ट करा.

प्र.६. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (१x१०=१०)

१. तुम्ही अभ्यासलेल्या साहित्यप्रकारातील समाजवास्तवाचं स्वरूप सांगा.

२. तुम्ही अभ्यासलेल्या साहित्यप्रकाराची आशयसूत्रे सविस्तर लिहा.

xxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxx